जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५२ दिनांक - २२/०१/२०२५**

खडक पोलीस स्टेशन,पुणे शहर

## सराईत वाहन चोराकडून एकूण ०६ मोटार सायकल जप्त करण्यात आले यश.

खडक पोलीस स्टेशनचे हद्दीत वाढते वाहन चोरीचे गुन्हयांना आळा घालण्याचे दृष्टीकोनातुन वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शशीकांत चव्हाण व पोलीस निरीक्षक गुन्हे श्रीमती शर्मिला सुतार यांनी तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या, त्याप्रमाणे तपास पथकातील प्रभारी अधिकारी श्री. अनिल सुरवसे, प्रल्हाद डोंगळे व तपास पथकातील स्टाफ असे खडक पोलीस स्टेशन पुणे शहर हददीत पेट्रोलिंग करीत असताना **पोलीस अंमलदार शेखर खराडे, पोलीस अंमलदार विश्वजीत गोरे व पोलीस अंमलदार संतोष बारगजे** यांना त्यांचे बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, खडक पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ५१/२०२५ बी.एन.एस. कलम ३०३(२) मधील मोटार सायकल चोरणारा एक संशयित इसम साठे कॉलनी, शुक्रवार पेठ पुणे येथे थांबला आहे अशी खात्रीशीर बातमी प्राप्त झाली.

सदरची बातमी लागलीच वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खडक पोलीस स्टेशन यांना कळविली असता, त्यांनी सदरच्या इसमास ताब्यात घेणेबाबत आदेश दिल्याने लागलीच आम्ही स्वतः व तपास पथकातील पोलीस स्टाफ असे सदर ठिकाणी जावुन प्राप्त वर्णनाप्रमाणे इसम व होंडा प्लेजर ही गाडी मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव व पत्ता **दत्ता ऊर्फ सुमित लहू जाधव वय २५ वर्षे रा. ५८० प्रेमनगर वसाहत, मार्केटयार्ड, पुणे मूळ पत्ता- गांव पानचिंचोली, ता. निलंगा, जि. लातूर** असे असल्याचे सांगितले. त्याचे ताब्यातील होंडा प्लेजर गाडीचे मालका बाबत त्याचेकडे विचारपुस केली असता तो गाडीचे मालकाबाबत विसंगत माहीती देऊ लागल्याने आम्ही त्यास विश्वासात घेवुन त्याचे ताब्यातील गाडीबाबत विचारपुस केली असता त्याने सांगितले की, सदाशिव पेठ येथ्रील पुणे जिल्हा मध्यवर्ती बॅकेच्या गल्लीतील मोकळया जागेतून चोरली असल्याची कबुली दिल्याने त्यास सदर गुन्हामध्ये अटक करुन तपास पथकाचे प्रभारी अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक अनिल सुरवसे यांनी अधिक तपास करता त्यांच्याकडून चोरीच्या १,२८,०००/- रु. किं.च्या ०६ मोटारसायकल जप्त केल्या असून सध्या खडक पो.स्टे. चे ०४ गुन्हे व स्वारगेट पोलीस ठाणे ०१ तसेच खोपोली पोलीस ठाणे, ०१ येथील गुन्हे उघडकीस आणून इतर गुन्हे उघड करण्याचे काम सुरू आहे.

नमुद कारवाई मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे श्री. प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ १ पुणे श्री. संदिपसिंह गिल, सहा पोलीस आयुक्त फरासखाना विभाग श्रीमती अनघा देशमाने, यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री शशिकांत चव्हाण,पोलीस निरीक्षक (गुन्हे),श्रीमती शर्मिला सुतार श्री. राहूल गौड सहा.पो.निरी. अनिल सुरवसे, पो.उप-निरी. श्री. प्रल्हाद डोंगळ, पोलीस अंमलदार हर्षल दुडम, किरण ठवरे, शेखर खराडे, विश्वजीत गोरे, सद्दाम

तांबोळी, अक्षयकुमार वाबळे, कृष्णा गायकवाड, मयूर काळे, संतोष बारगजे, उमेश मठपती, शोएब शेख, महिला पोलीस हवालदार नंदा विरणक, व सोनाली आडकर यांनी केली.

